# तत्त्वज्ञानाचा विभाग इतिहास

शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर महाविद्यालयाच्या वरिष्ठ स्तरावरील तत्त्वज्ञान विभागाची स्थापना संस्थेच्या स्थापनावर्षानंतर अंदाजे एक वर्षाने झाली. तत्कालिन प्राचार्य आणि महाविद्यालयाचे सर्वेसर्वा शिल्पकार प्राचार्य म. वि. कौडिण्य,सर्वश्री शंकरराव जोशी,ओंकारनाथ मालपाणी,हिंमतलाल शहा,दुर्वे नाना इत्यादी मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था स्थापना झाली. त्यावेळी कौडिण्यसरांनी बराच शोध घेवून पुणे  रहिवासी प्रा. एम.एल पोटेफोडे आणि प्रा.एस.व्ही. अत्रे यांना तत्त्वज्ञानविषयासाठी पाचारण केले.

प्रा.पोटफोडे आणि प्रा.अत्रे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली विभागाने चांगलीच वाटचाल केली.ग्रामीण भागातील जनतेला आणि विद्यार्थ्यांना देदीप्यमान भारतीय तत्त्वज्ञानाचा वारसा , परंपरा आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे हे महत्वाचे काम या जोडगोळीने केलेच, पण शिवाय पाश्चात्य तत्त्वज्ञानाची परंपराही तितकीच महत्वाची आहे, याची जाणीवही त्यांनी करून दिली.

भारतीय परंपरा हिंदु, जैन आणि बौध्द यांनी धर्मांनी बनलेली असून तीन शतकापूर्वी शिख धर्माच्या रूपाने ही परंपरा अधिकच समृध्द झाली आहे.शिवाय इस्लाम,ख्रिस्ती इत्यादि धर्मांना आपल्यात सामावून घेवून या परंपरेने आपला अवकाश अधिक व्यापक केला आहे; तसेच पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचा नवा धर्मही स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमिवर आपण आत्मसात करीत आहोत, या प्रगतीला कोणत्या तत्त्वज्ञानाची बैठक आहे, याचा परिचय या दोन मान्यवरांनी विद्यार्थ्यांना करून दिला.
त्यावेळी तत्त्वज्ञान या विषयाबरोबरच मानसशास्त्र आणि तर्कशास्त्र हे विषयही शिकविले जात असत. तर्कशास्त्र ही तत्त्वज्ञानाची शाखाच आहे तर मानसशास्त्र हे ही बराच काळ तत्त्वज्ञानाचाच अभ्यासविषय असल्याने तत्त्वज्ञानाचे शिक्षकच हे विषय शिकवित.मानसशास्त्राचा स्वतंत्र विभाग देशात व राज्यांमध्ये अस्तित्वात नव्हता. असे विभाग साधारण १९८०च्या दशकात सुरु झाले.आणि मानसशास्त्र तत्त्वज्ञानापासून सुटे झाले.

या दोघांच्या प्रयत्नांमुळे संगमनेर महाविद्यलयाच्या ग्रंथालयातील तत्त्वज्ञान विभाग नीटसा आकाराला आला आणि ते समृध्द झाले.त्यांनी तत्त्वज्ञानाचे महाकोश, एनसायक्लोपीडीया,लेखसंग्रह आणि अनेक मूळ ग्रंथ आणले.तत्त्वज्ञानास वाहिलेले परामर्श (हिंदी व मराठी), इंडियन फिलॉसॉफिकल क्वार्टरली त्यांनी महाविद्यालयात आणले. ही सारी ज्ञानसंपदा आज अतिशय दुर्मिळ म्हणून ओळखली जाते.

प्रा. अत्रे ३१ मे १९८५ रोजी सेवानिवृत्त झाले तर प्रा. पोटफोडे यांनी ३० जून १९९१ रोजी प्रकृती अस्वास्थ्यामुळे स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. यावेळी वरिष्ठ स्तरावर प्रा. विजय गुंजवटे अर्धवेळ शिक्षक म्हणून काम पाहात होते. त्याच काळात  कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रा. गंगाधर लांडगे हे होते, ते अकोले महाविद्यालय येथेही काम पाहात होते.त्यांना कालांतराने अकोले येथे पूर्णवेळ शिक्षकाची जागा मिळाली. त्यामुळे प्रा.गुंजवटे यांनाच प्रा.लांडगे यांचेजागी नियुक्ती मिळाली.आज कनिष्ठ महाविद्यालयात तत्त्वज्ञान विषयासाठी प्रा. निमसे काम करीत आहेत.

प्रा. पोटफोडे यांच्या सेवानिवृत्तीनंतर १९९१ साली प्रा.श्रीनिवास ओंकार हेमाडे यांची नियुक्ती झाली. गेली २० वर्षे ते विभागाची धुरा सांभाळत आहेत. प्रा. श्रीनिवास हेमाडे यांना पीएच. डी. साठी जूलै २००४ जून २००६ या काळात पुणे विद्यापीठात रजेवर जावे लागले.त्या दरम्यान प्रा. संदीप कदम यांनी कार्यभार सांभाळला.

श्रीनिवास हेमाडे यांच्या नियुक्तीकाली महाविद्यालयात तत्त्वज्ञान विषयाबरोबरच मानसशास,तर्कशास्त्र हे विषयही शिकविले जात असत.त्यांची जबाबदारी तत्त्वज्ञान विभागावरच होती.शिवाय त्यावेळी संस्थेने आणि महाविद्यालयाने पुणे विद्यापीठाने पुरस्कृत केलेला ' पुनर्रचित अभ्यासक्रम ' राबविला होता.त्यातील 'अे' कांपोनंट हा फाऊंडेन कोर्स यानावाने शिकविला जात होता. भारतीय संस्कृती, परंपरा,धर्म, विज्ञान, वैज्ञानिक वृत्ती इत्यादिंचा समावेश या कोर्सच्या अभ्यासक्रमात केलेला होता. असा व्यापक आवाका असणारा व मूलभूत महत्वाचा असलेला हा अभ्यासक्रम शिकविणे ही जोखमीची जबाबदारी होती.मूलभूततेमुळेच हा अभ्यासक्रम सर्व शाखांच्या प्रथम वर्षास सक्तीचा होता.या कारणांमुळेच या विषयाची जबाबदारी तत्त्वज्ञाना विभागाकडे, पर्यायाने साहजिकच  श्रीनिवास हेमाडे यांच्याकडे आली.त्यांनी ती यशस्वीरित्या पार पाडली आणि आजतागायत ते विभागाची धुरा सांभाळत आहेत.

विभागातील प्राध्यापक जसे निवृत्त होत गेले तशा त्यांच्या जागा शासकीय धोरणांमुळे कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्या.केवळ एकच जागा आज टिकून आहे. पुणे विद्यापीठातील १४५ कला महाविद्यालयात केवळ नऊ ठिकाणी तत्त्वज्ञान विषयाचे अस्तित्व टिकून आहे.त्यातही नाशिक जिल्ह्यात कोठेही हा विषय आज उरलेला नाही.या नऊपैकी पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील केवळ चारच ठिकाणी तत्त्वज्ञान हा विषय विशेष स्तरावर (स्पेशल लेव्हल ) आहे.त्यात संगमनेर महाविद्यालयातील या विभागाचा समावेश आहे.

प्रा. श्रीनिवास हेमाडे यांच्या नियुक्तीच्या वेळी महाविद्यालयातून हा विषय जवळपास निकालातच निघाला होता.कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावर केवळ तुरळक मोजके विद्यार्थि होते.त्यामुळे हा विभाग टिकविण्यासाठी विद्यार्थिसंख्या वाढविणे नितांत गरजेचे होते.हे नवे आव्हान होते.नंतरच्या कालात तेच वैशिष्ट्य ठरले आहे.हे आव्हान श्रीनिवास हेमाडे यांनी स्वीकारले आणि पहिल्याच वर्षी विभागात ३५ विदयार्थि मिळविले ! हीच परंपरा आज टिकून स्थिरावली आहे. गेली वीस वर्षे सातत्याने विद्यार्थि मिळवून विभागाने विषयाचे अस्तित्व टिकविले आहे.विभाग आज ' एकखांबी तंबू ' म्हणजे ' वन मॅन आर्मी' बनला आहे.साहजिकच विभाग आणि विभागप्रमुख श्रीनिवास हेमाडे हे एकात्म झाले आहे. परंपरेच्या भाषेत सांगावयाचे तर ते अद्‌वैत बनले आहे.

प्रा. श्रीनिवास हेमाडे यांनी बरेच लेखन केले आहे.गेली वीस वर्षे सातत्याने विविध विषयांवर लेखन झाले आहे.सर्व तऱ्हेचे लेख पाहाता त्यांची संख्या किमान पाचशे तरी भरेल.महाविद्यालयात प्राध्यापकपदी रूजू होण्यापूर्वी प्रा. श्रीनिवास हेमाडे यांनी दैनिक सकाळ मध्ये,पुणे व नाशिक आवृत्तीमध्ये पाच वर्षे उपसंपादक व पत्रकार म्हणून काम केले आहे.तेच काम त्यांनी महाविद्यालयात काम करताना जारी ठेवले.महाराष्ट्र टाईम्सचे ते सलग आठ वर्षे वार्ताहर होते.आज महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ,गावकरी, इंडियन अेक्सप्रेस, टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रांमधून त्यांचे लेख, सदर सातत्याने प्रकाशित होत असतात.नाशिक येथून प्रकाशित होणाऱ्या ' अभिव्यक्ती ' या मासिकाचे ते सात वर्षे संपादक होते.त्याचप्रमाणे विविध मासिके,पुस्तकांचे संपादन केले आहे.

विविध वृत्तपत्रांमधून त्यांनी विविध प्रकारचे सामाजिक,राजकीय,आर्थिक, वैचारिक लेखन केले असून त्यांची स्तंभलेखन झाले आहे.'गोष्ट माणसाची' हे तत्त्वज्ञानाचा परिचय करुन देणारे सदर, ' भ्रमणभाषी ' या टोपणनावाने SMS चे सदर लेखन, कथा विश्वकोशाची,भारतीय दर्शनातील स्त्री चित्रण,गोष्ट लिंगभावाची हे सदर लेखन केले आहे.नुकतेच २००९ मध्ये ॲग्रोवन या सकाळ प्रकाशनाच्या शेतीविषयक दैनिकात रविवार आवृत्तीमध्ये' कथा काळ्या आईची' हे शेतीचे नीतिशास्त्र आणि शेतीचे तत्त्वज्ञान स्पष्ट करणारे स्तंभलेखन पुर्ण झाले.

परामर्श,नवभारत,समाज प्रबोधन पत्रिका,आजचा सुधारक,परिवर्तनाचा वाटसरु,बायजा,पुरुष स्पंदन,पुरुष उवाच,चारचौघी, शब्दालय,पद्मगंधा,धनंजय,आजचा चार्वाक,समृध्दि,मानस, कदंब,वसा,लोकसत्ता,महाराष्ट्र टाईम्स, इत्यादी दिवाळी अंकामध्ये विविध विषयावर लेख, अनुवाद प्रकाशित झाले आहेत.

विभागाने गेली दोन दशके अनेक विद्यार्थ्यांना मागदर्शन केले.अनेक विद्यार्थि विविध प्रकारच्या शासकीय,निमशासकीय सेवेत असून अनेकांचे स्वतंत्र व्यवसाय आहेत.वकील,प्राध्यापक, शिक्षक,सल्लागार म्हणून अनेकजण काम करीत आहेत.महाविद्यालयातच प्रा.रवी गायकवाड,प्रा.सानप तसेच बी.एड.कॉलेजच्या प्राचार्या ज्युईली वेल्हाळ ही काही विभागाच्या माजी विद्यार्थ्याचा उल्लेख करणे ही आनंदाची बाब आहे.राजेंद्र खटाटे हे माजी विद्यार्थि औषध कंपनीत विभागीय अधिकारी म्हणून आणि मानसोपचार सल्लागार म्हणून कार्यरत आहे.विशेष म्हणजे विभागाची एक विद्यार्थिनी सुनीता वाकचौरे ही मुंबई येथे यशस्वी वकील म्हणून प्रसिध्द आहे तर अन्य एक विद्यार्थिनी रूपाली कृष्णराव ही 'स्टार प्रवाह'च्या 'झुंज' या मराठी मालिकेची यशस्वी अभिनेत्री म्हणून चमकत आहे.

'नॅक'च्या पुनर्मूल्यांकनाच्या निमित्ताने विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची कास पारंपरिक व्याख्यान पध्दतीला दिली आहे.स्लाईड शो,पॉवर पॉईट प्रेझेंटेशन तसेच चित्रपट ही माध्यमे पुरेपुर क्षमतेने विभाग उपयोगात आणत आहे. पूर्वी प्रा. श्रीनिवास हेमाडे यांचा स्वतंत्र ब्लॉग होताच पण आता विभागाची स्वतंत्र वेबसाईट तयार करण्यात आली असून विद्यार्थ्यांना नोट्स,व्याख्यानांची टिपणे,लेख,बातम्या इत्यादी उपलब्ध केलेली आहे.

नॅकच्या निमित्ताने विभागाने स्वतंत्ररित्या मिशन स्टेटमेंट्स निश्चित केली आहेत. भविष्यकालात तत्त्वज्ञानाचा आणखी सोपा परिचय करून देणे, तत्त्वज्ञानाची अटळता जाणवून देणे; त्यासाठी विविध प्रकारचे लेखन करणे, विद्यार्थि संख्या

विकसित करणे, ही वाटचाल निश्चित केली आहे.विभागाने तत्त्वज्ञान थेट जीवनविषयक समस्यांनी भिडेल,असे पाहिले आहे.त्यासाठीच उपयोजित नीतीशास्त्र आणि उपयोजित तत्त्वज्ञान अध्ययन, अध्यापन व त्यानुसार लेखन ही उद्दिष्टे विभागाने राखली आहेत. त्यानुसार ही वाटचाल सुरु राहील.